Impact Factor 4.574

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Journal

VOL-V ISSUE-V May 2018

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# जीएसटीचा भात आणि ऊस पिकावरील प्रभाव

**डॉ. सुधाकर पी. झांबरे**
एम.ए.एम.फिल. पी.एच.डी.
एस. एस. जे. महाविद्यालय, अर्जुनी/मोर, जि. गोंदिया

**प्रा. विजय आनंदराव दरवडे**
शामरावबापु कापगते कला महाविद्यालय, साकोली,
ता. साकोली जिल्हा भंडारा

शेती ही आपल्या जीवनातील संजीवनी आहे.वर्षानुवर्ष या शेतीने आपल्याला आर्थिक, सामाजिक, सांस्कृतीक, शैक्षणिक जिवनमान उच्चावण्यासाठी मदत केली आहे. आताही राज्याच्या खेडे भागात जास्त संख्येने रोजगार निर्मितीसाठी शेती व्यवसायची भुमीका महत्वाची आहे. परंतु हवामानातील बदल, अवेळी पाऊस, गारपीट, दुष्काळ, नापिकी, मजुरांची टंचाई, रोगराई,शेतीमालाला मिळणारा कमी मोबदला. या दृष्टचक्रात सापडलेल्या शेतकरीवर्गाला जीएसटीचा सामना करावा लागतो.

कृषीप्रधान देशाची आर्थिक उन्नती शेतकऱ्यांवरच म्हणजेच शेतीवर अवलंबून आहे. त्यामुळे शेतकऱ्यांला पालनहार समजल्या जात असते. परंतू निसर्गाच्या लहरीपणामूळे कधी ओला तर कधी कोरडा दुष्काळ यामुळे शेतकरी आधीच संकटाच्या खाईत पडलेला आहे. असे असतांना सुध्दा पुन्हा कृषी उत्पादनाच्या पडलेल्या भावामुळे जिल्हातील कृषी उत्पादक शेतकरी हादरलेला दिसत आहेत. या संकटापासून संकटे येणा–या शेतक–यांवर हा साडेशतीचा फेरा केव्हा निघेल असा प्रश्न अनेक शेतकऱ्यांना पडलेला आहे. शेतक–यांना लाचारी,गरीबी,दारीद्राच्या खाईत जिवन जगावे लागत आहे. यावर्षी अत्यंत प्रतिकूल परिस्थित शेतकऱ्याला जीएसटी चा सामना करावा लागत आहे. यामधून सावरता सावरताच होईल. यावर्षी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीलत शेतकरी वर्गाला अनेक संकटाना तोंड दयावे लागत आहे. आपली देशाची अर्थव्यवस्था कृषीवर आधारीत असतांना देशातील शोषीत,पिडित अन्नधान्य उत्पादक शेतकऱ्यांच्या कृषीपिकांचे भाव किंवा अन्य पिकाचे भाव वाढत नाही असा सवाल नापीकीच्या दुष्काळाच्या चक्रवृव्हात सापडलेल्या शेतकऱ्यांनी उपस्थित केलेला आहे. दोन तीन वर्षापासून किटकनाशक औषधी व रासायनिक खतांच्या किंमती आणि मजुरांच्या मजुरीत वाढझालेली आहे. खर्च अधिक व उत्पन्न कमी होत आहे मात्र खर्चावर आधारीत कृषी पिकाला हमीभाव नाही. शासन सुध्दा कृषी उत्पन्नाला भाव देण्यास टाळाटाळ करीत आहे. आजच्या परिस्थितीत पिकाचे भाव घसरले आहेत. एका पिकाचे दुसऱ्या पिकासोबत भेदभाव केल्या जात आहे. त्यातच भंडारा जिल्हयातील भात आणि ऊस उत्पादक आर्थिक विवंचनेत सापडला आहे. कृषी उद्योग सोडून इतर उधोगालाझुकते माप देत आहे.

शासनाद्वारे जिल्हा परिषद व शासनाच्या विविध योजना सुरू आहेत जिल्हापरिषदेतुन स्वीय निधितुन शेतकऱ्यांना कृषी अवजारासाठी अनुदान दिला जातो. व राज्यशासनाच्यावतीने अनुदान मंजुर केल्या जातो. मागील काळात कृषी अवजारासाठी 0 ते 6 टक्के व्हॅट लावला जात होता. परंतु आता मात्र 5 ते 18 टक्के जीएसटी लागु झाली आहे. सौरपंप, बॅटरी पंपाना व्हॅट लागू नव्हता त्यावर 6 टक्के व्हॅट होता. त्यावर 12 टक्के जीएसटी लागु झाली. त्याचप्रमाणे कृषी अवजाराच्या किंमतीवरही 5 ते 12 टक्के कर लावला आहे. कृषी अवजारावरील योजनामधील अनुदान आणि लाभार्थी शेतकरी हिस्सा पाहता अनुदानाची रक्कम ही अवजारांच्या किंमतीच्या 50 टक्के बोजा जीएसटी मुळे बसणार आहे.

थेट कृषी मार्फत कृषी अभियांत्रिकीकरण,मका विकास कार्यक्रम, गळीत धान्य विकास कार्यक्रम,कडधान्य विकास कार्यक्रम, तृणधान्य विकास कार्यक्रम,राष्ट्रीय विकास कार्यक्रम या योजनेमधून विविध कृषी अवजारे खरेदीसाठी शासन अनुदान देते. शेतीच्या मशागतीकरीता वापरल्या जानारा आधुनीकयत्र टॅक्टर सारख्या साधणाच्या सुटे भागावर जीएसटी

अधीकच लावल्यामुळे याचा बोजा शेतकरी वर्गावर पडत आहे. आधी रोटावेटर चापकटर इत्यादी अवजारासाठी 36 ते 42 टक्क्यापर्यंत अनुदान दिल्या जात असे. परंतू जीएसटी मुळे वाढलेली किंमत शेतकऱ्यांनाच भरावी लागणार आहे. तर काही योजनेकरीता अनुदानही कमी झालेले आहे. शासनाने कृषी अवजारावरील जीएसटी कमी केल्यास तसेच अनुदानाची रक्कम वाढविल्यास शेतकऱ्यांना दिलासा मिळू शकतो.

कल्याणकारी राज्यामध्ये सरकारला लोककल्याण कार्यावर मोठयाप्रमाणत खर्चकरावा लागत लागतो. तो खर्च पूर्णकरण्यासाठी विविध वंस्तु व सेवांच्या उत्पादनावर कर लावणे गरजेचे असते. सार्वजनिक कार्याचा खर्च भागविण्यासाठी लोकांच्या उत्पन्नाचा जो भाग सरकारद्वारे सक्तीने वसुल केला जातो. त्याला कर म्हणतात. हे कर वसुल करण्याचा अधिकार फक्त शासनाने ठरवून दिलेल्या संस्थेलाच असते. कर देणे हे लोंकाच्या मर्जीवर अवलंबुन नसते तर ते कर लोकांना दयावेच लागते. जो व्यक्ती कर देणे टाळतो तो शिक्षेला किंवा दंडाला प्राप्त होतो. सरकारद्वारे जनतेला अनेक प्रकारच्या वस्तु व सेवा पुरविल्या जातात उदा. रेल्वे, पोष्ट, आणि टेलीग्राफरच्या विविध सेवांचा मोबदला जनतेद्वारे सरकारला दिला जातो. हा मोबदला म्हणजे किंमत होय. ज्या प्रमाणातजनता सरकारी सेवांचा लाभ घेतात. त्याच प्रमाणात किंमत दयावी लागते. जनकल्याणाच्या कार्यासाठी हे उत्पन्न प्राप्त करणे आवश्यक ठरते. परंतु करप्रणाली नागरिकांना त्रासाची ठरू नये तसेच सरकारच्या दृष्टीने देखील ते पुरेषे उत्पन्न प्राप्त करून देणारे असले पाहिजे. राष्ट्रातील प्रत्येक जनतेने आपल्या कर देण्याच्या शक्तीच्या प्रमाणात सरकारला कर दिले पाहिजे.

**ॲड्म स्मिथ** च्या तत्वानुसार सरकारने समप्रमाण दराने कर लावले पाहिजे. या विधानाचे संमर्थक होते. तर आधुनिक शास्त्रज्ञांना हे मत मान्य नाही. त्यांच्या मते करारोपणात न्यायता आणि समता साधण्यासाठी करारोपण अधिप्रमाण दराने केले पाहिजे असे त्याचे मत होते.

कराच्या माध्यमातुन सरकार उत्पन्न मिळवित असतो. त्या उत्पन्नातुन सर्वसामान्याचे हित विचारात घेतले जाते. उत्पन्न मिळविण्याचे महत्वपूर्ण साधन म्हणजे कर होय. करआकारण्याचे विविध प्रकार आहेत. या विविध करआकारनि मुळे वस्तूच्या किंमती मध्ये फरक दिसायला लागले कारण वेगवेगळे राज्य आपआपल्या पद्वतीने कराची आकारणी करीत असत. त्यामुळे विविध प्रकारच्या करप्रणालीमुळे जनतेला हिशेब ठेवणे कठीण होत आहे. असा या विविध करप्रणालीमुळे असंघटीत उत्पादकावर वचक ठेवने सरकारला अशक्य होते. या सर्व समस्याचा विचार करता कॉग्रेस सरकारणी 2006–07 मध्ये जीएसटी प्रणाली समोर आणण्याचा प्रयन्न केला. परंतु या वेळी जीएसटी. अमलात येऊ शकली नाही. तर 1 जुलै 2017 ला जीएस.टी. अमलात आली.

जीएसटी म्हणजे वस्तु व सेवा कर असून तो 1 जुलै 2017 पासून तो पूढे लागु राहिला अनेक प्रगत देशात याच पद्वतीने करप्रणली अस्तित्वात आहे. जीएसटी हा एक अप्रत्यक्ष कराचाच एक प्रकार आहे.

**जीएसटीचेकृषी अर्थव्यवस्थेसंबधी अनुकुल मुददे :–**

1. जीएसटी करप्रणलीमुळे ज्या व्यक्तीला कर भरणे आहे त्याच व्यक्तीला तो कर भरावा लागतो. त्यामुळेकरसंक्रमणात घट होऊन कर भरणे,कराची आकारणी करणे यामध्ये सुलभता येईल.
2. कर आकारणी, करचुकवेगिरी, करवसुली या मध्ये होणारी हेराफेरी, वादविवाद बंद होईल एकाचव्यक्तीला किंवा संस्थेला अनेक ठीकाणी वेगवेगळे कर देणे थांबेल त्यामुळे सरकारकडे जमा होणारी रक्कम वाढेल व वस्तुच्या किंमती कमी होतील.देशभ–यामध्ये कोणतीही वस्तु घेतली तरी ती वस्तु एकाच किमंतीला मिळेल;उदा. फ्रिज,टिव्ही, कृषी अवजारे, वाहान इत्यादी मुळे कोणत्याही एका व्यक्तीवर अधिक भार पडणार नाही.
3. जीएसटी मुळे सघंटीत व असंघटीत क्षेत्रातील उद्योगामधील विसंगता कमी होईल. कारण हयानंतर असंघटीत उद्योगांनाही कर भरावे लागेल. यामुळे सरकारी उत्पादनामध्ये वाढ होईल.

4. जीएसटी मुळे गरीब जनतेला आर्थिक आणि शैक्षणिकदृष्टया फायदा होईल.
5. यापूर्वी कर वाचविण्यासाठी ज्या राज्यातील उत्पादन त्याच राज्यात विकल्या जात होते. परंतू जीएसटी मुळे एका राज्यातील उत्पादन दुसऱ्या राज्यात विक्रीला जाईल जे चांगले उत्पादन देशाच्या एका भागात मिळत नव्हते ते देशाच्या दुसऱ्या भागात मिळतील यामूळे प्रत्येक व्यक्तीला मालाची निवड करण्याला संधी उपलब्ध होतील त्यामुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळेल.

**जीएसटीचेकृषी अर्थव्यवस्थेवरील परिणाम :–**

1. **शेतीला मिळणा–या अनुदानावर परीणाम** :– 1जुलै 2017 पासुन जीएसटी अमलात आल्यामुळे व शेतकऱ्याच्या नापिकमुळे शासनस्तरावरील अनुदान महागले त्यामुळे शासणानी मंजुर केलेले अनुदान तसेचपडून आहे.ते अनुदान परत जाण्याच्या मार्गावर आहेत. असे दिनांक 20.12.2017 च्या देशोन्नती वर्तमानपत्रात जाहिर करण्यात आले.
2. **वाहतूक खर्चात वाढ** :–' माल एका गोदामातून दूस–या गोदामात, एका शहरातून दुसऱ्या शहरात जी वाहतूक होते त्यावर वाहतुक कर लावण्यात येतो. जीएसटी मूळे रबरवर 28 टक्के जीएसटी लावल्यामुळे टायरच्या किंमती वाढल्या टॅक्टर व टॅक्टर ट्रालीच्या किंमतीवर त्याचा असर पडलेला आहे. त्यामुळे मालवाहतुक माहागली आहे.
3. **वेळेची बचत** :– कर प्रणालीमध्ये व्हॅट,एक्साईज टॅक्स,सर्व्हिस टॅक्स यामूळे अनेक दस्तावेज तयार करावी लागत होते. परंतु जीएसटी मूळे वस्तु व सेवा वर लावण्यात येणारे कर एकच असल्यामूळे इतर टॅक्सचा लेखा जोखा ठेवण्याची गरज नाही. त्यामुळे वेळेची बचत होते.
4. **किटकनाशकाच्या किंमतीत वाढ** :–दिवसेन दिवस हवामानातील बदल अणि पर्यावरणतील वाढत चाललेले प्रदूषण या मुळे भात व ऊस पिकावर किडिचा प्रभाव वाढत गेला. त्याकरिता उत्पन्न वाढविण्यासाठी किटकनाशकाचा वापर करावाच लागतो. त्याचापण परिणाम कृषीवर पडलेला आहे. किटकनाशकावर 18 टक्के जीएसटी लागल्यामुळे कीटकनाशकाच्या किमंती वाढलेल्या आहेत. यापूर्वी 5 ते 14 टक्के पर्यत टॅक्स लावल्या जात असे. याचा अर्थ असा की शेतकऱ्याना शेती करण्याकरीता अधिक किमंत दयावी लागते. त्यामुळे शेती महागात पडूल शेतकऱ्यांचा नफा नाहीसा होईल.
5. **कृषीवर आधरीत व्यवसायावर परीणाम** :– दुध्दउत्पादन, कुकुट पालन, अन्य–प्राणी पालन, बी–बीयाणे, गवत फळे झाडे तोडणे, जंगल निर्मिती इत्यादी व्यवसाय करणा–या शेतकरी वर्गावर जीएसटीचा फटका बसेला आहे.

**संदर्भ ग्रंथ:–**


1. अर्थशास्त्र–हिमालय बुक्स प्रा.लि. डॉ. शरदचंद्र कोपर्डेकर, डॉ. अरूणा सोनेगावकर, डॉ. विनायक श्रीधर देशपांडे
2. डॉ. झामरे जी.एन.: 'स्थुल अर्थशास्त्र' पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.2001
3 'देशोन्नती वर्तमानपत्र' भंडारा विशेष
4 www.yourarticallibrary.com